पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: www.sus.ac.in ई-मेल: Purchaseu2019@sus.ac.in, faor@sus.ac.in
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

जा.क्र.पुअहोसोविसो/विवले/खभांवि/२०२५/ 175 दिनांक: 19 JUN 2025

प्रति

------------------------

------------------------

**विषय: प्रस्तुत विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन विभागाकडील वापर झालेले उत्तरपत्रिका, इतर कार्यालयीन रेकॉर्ड आणि रिकामे खोके (कार्टन) इ. रद्दी वार्षिक दरकरारामधून विक्री करण्यासाठी दरपत्रके मागविण्याबाबत...**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उपरोक्त नमूद विषयाप्रमाणे दरपत्रके मागविण्यात येत आहेत. आपले अपेक्षित दर GST करासह अंदाजपत्रकामधील {***SCHEDULE - B***} तपशिलाप्रमाणे दरपत्रकामध्ये भरुन मा. वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या नावे सीलबंद लिफाफ्यात पाठवावे. दरपत्रकासंदर्भात सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

वरील कामाचे दरपत्रक, सुचना सोलापूर विद्यापीठाच्या http://sus.ac.in या संकेतस्थळावर ***(Quotation)*** या शिर्षकाखाली उपलब्ध आहे. **तसेच सोबत जोडलेल्या Schedule-B मधील तपशिलाप्रमाणे दरपत्रक सादर करावे.**

| अ.क्र | तपशिल | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १. | दरपत्रके प्रकाशित करण्याचा दिनांक व वेळ | १९/०६/२०२५ | | वित्त व लेखा विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग, केगांव, सोलापूर- ४१३ २५५ |
| २. | दरपत्रके स्विकारण्याची दिनांक व वेळ | १९/०६/२०२५ | | |
| ३. | दरपत्रक सादर करणे अंतिम दिनांक व वेळ | २६/०६/२०२५ | सायं. ०६.०० | |
| ४. | दरपत्रक उघडण्याचा दिनांक/वेळ आणि ठिकाण (शक्य झाल्यास) | २७/०६/२०२५ | दु. ०४.०० | |

(सीए एम. एस. खराडे)
**वित्त व लेखा अधिकारी**

## सुचना व अटी

१. दरपत्रक हे सिलबंद पाकिटातून कार्यालयीन वेळेत मा. वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग केगांव, सोलापूर-४१३ २५५ यांच्या नावाने विहित मुदतीत पोहोचतील अशा बेताने पाठवावीत.

२. पाकीटावरती *प्रस्तुत* **विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन विभागाकडील वापर झालेले उत्तरपत्रिका, इतर कार्यालयीनत रेकॉर्ड आणि रिकामे खोके (कार्टन) इ. रद्दी वार्षिक दरकरारामधून विक्री करण्यासाठी** ***दरपत्रके*** असा स्पष्ट उल्लेख करावा.

३. SCHEDULE-B मधील Specification प्रमाणे पुरवठा करणे आवश्यक आहे.

४. **दरपत्रकामध्ये खाडाखोड किंवा व्हायटनर चा वापर केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.**

५. **महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (शॉप ॲक्ट लायसन्स) मध्ये नमूद केलेल्या व्यवसायाचा संबधित खरेदी किंवा कामाशी संबध असणे आवश्यक आहे. (संबधित साहित्य खरेदी व कामाचा अनुभव असणे बंधनकारक राहिल.)**

६. **संबंधित कामाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.**

७. **शॉप ॲक्ट लायसन्स, पॅन कार्ड, GST Registration, यांच्या छायांकित प्रती जोडणे बंधनकारक राहील. तसेच नियमानुसार GST Registration प्रमाणपत्र नसल्यास तसे हमीपत्र फर्मच्या लेटरहेडवर तयार करुन जोडावे.**

८. दिलेल्या मुदतीनंतर म्हणजेच उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच अटी व शर्ती अपूर्ण असलेली दरपत्रके मंजूर करण्यात येणार नाहीत.

९. **दरपत्रके हे देताना आपले दर सर्व करासहित (Including GST किंवा Excluding GST) किंमत असा स्पष्ट उल्लेख करावा. सदर साहित्य हे विद्यापीठात आवश्यकते प्रमाणे स्व:खर्चाने पुरवठा करणे व सेवा देणे बंधनकारक राहील.**

१०. **फर्मने दिलेले दर हे अंतिम राहतील त्यामध्ये कोणतीही वाढ केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

११. **न्युनतम दर असलेल्या फर्मला कार्यारंभ/पुरवठा आदेश दिल्यानंतर विहित मुदतीत काम न केल्यास संबंधित फर्मवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.**

१२. कार्यारंभ/पुरवठा आदेशाप्रमाणे साहित्य प्राप्त झाल्याची खात्री झाल्यानंतरच प्रचलीत कराची कपात करून देयक आदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१३. **कामाचा दर्जा उत्तम असावा.**

१४. कोणतेही कारण न देता दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे किंवा कोणत्याही टप्प्यावर प्रक्रिया रद्द करण्याबाबत विद्यापीठाने अधिकार राखून ठेवलेले आहेत. तसेच पुरवठा आदेशानुसार साहित्य नसेल तर पुरवठादाराचा ठेका रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

१५. वरील दरपत्रकासंदर्भात काही शंका/अडचण असल्यास विद्यापीठाच्या ०२१७-२७४४७७०-७४ (Ext.१७३) या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१६. **पुरवठा आदेशातील सर्व अटी व शर्ती माझ्यावर बंधनकारक राहतील.**

१७. **सदर सुचना व अटी मान्य असल्याची स्वाक्षरी व शिक्का असलेले दरपत्रक तसेच सोबत जोडलेले हमीपत्र (Declaration) भरुन स्वाक्षरी व शिक्कासह जोडणे बंधनकारक असेल त्या शिवाय दरपत्रकाचा स्विकार केला जाणार नही. याची नोंद घ्यावी.**

१८. **वरील सुचना व अटी मान्य आहेत.**

१९. **ज्या पुरवठाधारकाचे दरपत्रक मान्य होईल अशा पुरवठादारांनी कामाचे आदेश मिळाल्यानंतर किंवा वेळोवेळी दिलेल्या लेखी अथवा तोंडी आदेशाने स्वखर्चाने ३० दिवसाच्या आत रद्दी घेवून जाण्याचे आहे.**

२०. पुरवठाधारकांनी रद्दी घेवून जाण्यासाठी येणाऱ्या वाहनांची पुर्व सूचना देवून, विद्यापीठ प्रतिनिधीच्या समक्ष रिकाम्या वाहनाचे वजन करून आणणे व भरलेल्या वाहनाचे वजन विद्यापीठ प्रतिनिधीच्या समक्ष करणे बंधनकारक राहील.

२१. वाहनामध्ये भरलेल्या रद्दीची किंमत वित्त व लेखा विभागाकडे रोखीने अथवा RTGS/NFT ने भरणा करून पावती सादर केल्यानंतर रद्दी घेवून जाण्याचे आहे.

२२. ज्या पुरवठादारांचे दरपत्रक मान्य होईल त्यांस सुरक्ष ठेव म्हणून ३ टक्के किंवा पुरवठाधारकास मिळालेल्या कामाच्या प्रमाणाची वार्षिक बेरीज करून त्या प्रमाणात सुरक्षा ठेवीची रक्कम मा. वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या नावे विद्यापीठ कार्यालयात भरावे लागतील.

२३. काही कारणास्तव पुरवठाधारकांकडून दरकराराच्या मुदतीत काम करण्याचे किंवा रद्दी घेवून जाण्याचे नाकारल्यास विद्यापीठ इतर पुरवठाधारकांकडून सेवा घेईल व त्यापोटी विद्यापीठाचे झालेले नुकसान पुरवठाधारकांकडून वसूल केले जाईल.

२४. पुरवठादारांनी वापर झालेल्या उत्तरपत्रिका समक्ष फाडून घेवून जाणे बंधनकारक आहे.

२५. ज्या पुरवठादारास वरील अटी मान्य असतील त्यांनी अटी मान्य असल्याचे लेखी रु.५०० च्या स्टॅम्प पेपरवर करारनामावर लिहून देणे बंधनकारक आहे.

**पुरवठादाराची स्वाक्षरी व शिक्का**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## वार्षिक दरकरारामधून रद्दी विक्रीच्या कामाकरीता दरपत्रक मागविणबाबत

| अ.क्र | रददीचा तपशील | आपले दर प्रति टन |
|---|---|---|
| १ | वापर झालेल्या उत्तरपत्रिका | |
| २ | प्रश्नपत्रिका व इतर कार्यालयीन रेकॉर्ड | |
| ३ | रिमाके खोके (कार्टन) | |

आपण द्यावयाचे दर हे Including GST किंवा Excluding GST असे स्पष्ट द्यावेत निविदाधारकांनी दिलेले दर हे एकत्रिपणे न धरता वस्तूनिहाय प्रमाणे (आयटम वाईज) ग्राहय धरले जातील.

स्थळ: (पुरवठाधारकांची स्वाक्षरी व शिक्का)

दिनां : नाव:

NAAC Accredited-2022
'B+++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## रद्दी विक्रीच्या कामासाठी वार्षिक दरकरार करण्याकरीता लागणारी तांत्रिक बाबीची कागदपत्रे

१. मुंबई दुकाने व संस्था नियम, १९४८ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व अतिम दिनांक

२. संस्थेचे PAN नंबर स्कॅन कॉपी

३. संस्थेचे GST नंबर स्कॅन कॉपी

४. हमी पत्र स्कॅन कॉपी

५. सुचना व अटी सही शिक्क्यानिशी स्कॅन कॉपी

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## वार्षिक दरकरारामधून रद्दी विक्री करण्याबाबत

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ठेकेदार नांव | : | ______________________ |
| २. | कार्यालयीन पत्ता, संपर्क क्रमांक व ई-मेल | : | ______________________<br>______________________<br>______________________<br>______________________ |
| ३. | ठेकेदाराचे नांव, पत्ता, संपर्क क्रमांक ई-मेल | : | ______________________ |
| ४. | मुंबई दुकाने व संस्था नियम, १९४८ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व अतिम दिनांक | : | ______________________ |
| ५. | व्यावसाय कर/ कर नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व अंतिम दिनांक | : | ______________________ |
| ६ | संस्थेच पॅन क्रमांक | : | ______________________ |
| ७ | संस्थेच जी.एस.टी. क्रमांक | : | ______________________ |
| ८ | दुरध्वनी क्र./ मोबाईल क्रं. | : | ______________________ |

सही

(नाव )

(पुरवठाधारकांची स्वाक्षरी व शिक्का)

# हमीपत्र

मी, खाली सही करणार श्री/श्रीमती -------------------------------------------------------------------------,
संचालक, --------------------------------------------------------------असे नमूद करतो/करते की, मी परीक्षा व मूल्यमापन मंडळ, या विभागाकडील रद्दी विक्रीच्या करण्याकरीता दरपत्रक विहित नमुन्यात भरून देत आहे, दरपत्रक भरण्यापुर्वी विहित दरपत्रक अर्जात नमुद केलेली सर्व माहिती आणि पुराव्यादाखल जोडलेली सर्व प्रमाणपत्रे ही माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि वास्तव आहेत. तसेच मी खालीलप्रमाणे हमी देत आहे.

दरपत्रकासोबत जोडलेली कागदपत्रे सत्य असून त्यात कोणतेही असत्यता आढळल्यास किंवा सिध्द झाल्यास कोणत्याही स्तरावर माझे दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल, याची मला पुर्ण जाणीव आहे. तसेच पुढे मी असेही नमूद करतो/करते की, दरपत्रक संबंधीत सर्व नियम व अटी मी काळजीपुर्वक वाचलेल्या असून त्या माझ्यावर बंधनकारक राहतील.

स्थळ: (पुरवठादाराची स्वाक्षरी व शिक्का)

दिनांक: नाव: